# जिल्हा कामगार कार्यालयातला महाभ्रष्टाचार विधानभवनात गाजला

# बीडचा कामगार दुबई,अमेरिका व्हाईट हाऊस येथे काम केल्याच्या नोंदी

## बांधकाम अधिकारी कोणाळे,निरीक्षक काशीद सह या अगोदर सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची उच्चस्तरीय समितीकडून चौकशी होणार;विधानभवनात कामगार मंत्र्याने केले स्पष्ट


बीड (सरकार): बीड जिल्हा कामगार कार्यालय भ्रष्टाचाराचा कळस एवढा वाढला की, मयत व्यक्ती जिवंत होऊ लागला. आणि जिवंत व्यक्ती दाखविलेला परत मयत होऊ लागला. अशा पद्धतीने वागत या कार्यालयातील जिल्हा कामगार अधिकारी कोणाळे व त्याच्या अगोदरचा फुशारकी मारणारा सेवानिवृत्त झालेला जिल्हा कामगार अधिकारी आणि निरीक्षक काशीद यांची संगनमताने झालेला भ्रष्टाचार आणि मनमानी कारभार पाहत आज विधानभवनात आष्टीचे आमदार यांनी मुद्दा उपस्थित करत देशाबाहेर काम करत असलेले अनेक मुद्दे मांडत जिल्हा कामगार कार्यालयात कशा पद्धतीने भ्रष्टाचार झाला याची चौकशी तारांकित प्रश्नाव्दारे उपस्थित केल्यानंतर कामगार मंत्र्याने जिल्हा कामगार कार्यालयातील अधिकाऱ्याची उच्चस्तरीय समिती स्थापन करून चौकशी करण्याचे स्पष्ट केले. त्याच बरोबर अंबाजोगाई न.प.मधील दोषी, अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार असल्याचे बोलले जात आहे. जिल्हा बांधकाम अधिकारी कोणाळे व याच्या अगोदर असलेला सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याच्या कारभाराची चौकशी झाली पाहीजे. केवळ या दोन अधिकाऱ्यांची चौकशी न होता मागील अधिकाऱ्यांची चौकशी या उच्च स्तरीय समितीकडून केली पाहीजे अशी चर्चा होत आहे.



मयत व्यक्तीच्या नोंदी कामगार म्हणुन करण्यात आल्या, मयत झालेल्या व्यक्ती जिवंत झाल्या त्यानंतर त्यांनी वरून खाली येऊन १०० दिवस काम केले व त्यांना तसे प्रमाणपत्र देण्यात आले, नंतर त्यांची कामगार म्हणुन नोंद झाली व योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा ते मयत झाले, यासाठी त्यांनी बीड येथील एक उदाहरण पुराव्यासह दिले. बोगस कागदपत्र व नोंदी वापरून अनेक ठिकाणी बोगस कामगार नोंदणी झाल्याचे

धाराशिव येथील जिल्हा कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे व अजय काशीद या दोन अधिकाऱ्यांची जोडीने मोठा घोटाळा केल्याचा आरोप त्यांनी केला. धाराशिव नगर परिषदेचे एक माजी नगराध्यक्ष बांधकाम कामगार असल्याचा गौप्यस्फ़ोट आमदार धस यांनी केल्याने तो नगराध्यक्ष कोण ? याच्या चर्चेला उधाण आले आहे.

बोगस बांधकाम कामगार नोंदणी व विविध योजनेच्या लाभार्थी यांची सचिव दर्जाच्या अधिकारी मार्फत चौकशी करावी, गुन्हे नोंद करून आर्थिक वसुली करावी अशी मागणी त्यांनी सभागृहात केली. बीड जिल्ह्यात दुबई येथील बुर्ज खलिफा येथे तर




अमेरिका येथील व्हाईट हाऊस येथे कामगार असल्याच्या व काम केल्याच्या नोंदी घेतल्या असुन त्या आधारे बांधकाम कामगार नोंदणी झाल्याचा धक्कादायक खुलासा केला.

काही ठिकाणी बोगस बांधकाम कामगार नोंदणी झाल्याचे मंत्री फुंडकर यांनी सभागृहात मान्य केले. कामगार नोंदणी आधी ऑफलाईन होती त्यावेळी असे प्रकार मोठ्या प्रमाणात झाले, हे टाळता यावे यासाठी ऑनलाईन नोंदणी सुरु केली. महाराष्ट्रत बोगस एजेंट खोटे कागदपत्रे तयार करत आहेत, खोटे सही शिक्के तयार करीत आहेत. नगर परिषदेचे खोटे कागदपत्रे तयार होत असणे ही गंभीर बाब आहे. मयताच्या टाळूवरील लोणी खाल्ल्याचा हा प्रकार आहे. नोंदणी अधिकारी असो नप अधिकारी असो कोणालाही यात सोडले जाणार नाही. एक स्वतंत्र अधिकारी नेमून याची चौकशी करू यात जो जो दोषी असेल त्याच्यावर कारवाई करू असे आश्वासन पटलावर दिले.


कामकार कल्याणकारी महामंडळात दलालाची लॉबी सक्रीय असुन काही अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करीत सोईनुसार नोंदणी करून लाभ दिला जात आहे. बांधकाम कामगार नोंदणी करताना अनेक कागदपत्रे बोगस जोडली आहेत. धाराशिव जिल्ह्यात जवळपास ३१ हजार कामगारांची नोंदणी आहे. बांधकाम कामगारांच्या पाल्यांना शैक्षणिक मदत, कामगारांना संसार उपयोगी साहित्य देण्यासह बांधकामाच्या अनुशंगानने आवश्यक साहित्य मोफत वाटप केले जाते. ३० पेक्षा अधिक योजना महामंडळाकडुन राबविल्या जात असुन त्यात शिक्षण, विवाह, घर व जीवनमान सुधारणे, कुटुंब व सामाजिक योजनाचा समावेश आहे, या सर्व चौकशीच्या रडारवर आहेत.

beedsarkar
संपादक-आदोडे साहस
E-mail : beedsarkar @ Gmail.com
E-mail : beedsarkar @ Gmail.com   किंमत: १ रू.   पाने : ४

# बीडसरकार

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १३ वे ■ अंक १२१ ■ मंगळवार १७ मार्च २०२६ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल दि.१८ मार्च २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 13 ■ Issu 121 ■ Tuesday 17 March 2026 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027








## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या चांगल्या कारभाराला माजलगाव तहसीलदार,उपविभागीय अधिकाऱ्यांकडून सुरूंग

# वाळू माफियांसमोर लोटांगण घेत; वाळू उपसायला पोकलेन,जेसीबीने दिली परवानगी

### तहसीलदार रूईकर,उपविभागीय अधिकारी गौरव इंगोलेच्या कारभाराने जिल्हा प्रशासनाचा लाखो रूपयांचा महसूल पाण्यात

### जिल्हाधिकारी साहेब, रूईकर, इंगोलेचे मोबाईल लोकेशन तपासा; वाळू माफियाची दलाली करणाऱ्यावर कारवाई करा

**माजलगाव । शेख मुजफर**

जिल्हा प्रशासनाने माजलगाव तालुक्यातील मंजरथसह इतर ठिकाणी वाळूचे ठेके बहाल केले. मात्र यासह नियम व अटी, शर्ती लावून नियमाचे उल्लंघन केल्यास कारवाईचा बडगा उगारला जाईल असे सांगितल्यानंतरही या नियमाला व जिल्हाधिकारी यांच्या चांगल्या कारभाराला माजलगाव तहसीलदार रूईकर आणि उपविभागीय अधिकारी वैभव इंगोले यांनी काळीमा फासला आहे. राजरोजपणे वाळू माफियासमोर एक प्रकारे लोटांगणच घेतले की काय? अशा पद्धतीने वागत असून वाळू माफियांना थेट वाळू उपशासाठी कोट्यावधी रूपयांचे पोकलेन अनेक लावून वाळू उपसा करण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यामुळे एकीकडे जिल्हाधिकारी जिल्ह्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातंर्गत गावकुसावर, वाडी, तांड्यावर जाऊन लोकांना सर्वोतोपरी मदत करत आहेत. त्यांच्यासाठी सर्व योजना त्यांच्या दारात नेण्याचे काम करत आहेत. तर दुसरीकडे माजलगावचा तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी वाळू माफियांना पोसण्याचे काम सुरू केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या चांगल्या कारभाराला सुरूंग लावत वाळू माफियांना दिवसरात्र यंत्राने वाळू उपसण्याची मुभा दिली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी साहेब तहसीलदार रूईकर व उपविभागीय अधिकारी यांचे वाळूचे ठेके झाल्यापासून त्यांचे लोकेशन काढा. त्याच बरोबर त्यांच्यासह त्यांच्या चालकाचेही सर्व पद्धतीने चौकशी करा.म्हणजे या दोन अधिकाऱ्यांना वाळू माफियांना कशा पद्धतीने जिल्हा प्रशासनाची प्रतिमा मलीन करीत असल्याची जोरदार चर्चा होत आहे.

जिल्ह्यामध्ये विभांगीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, परळी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, बीड तहसीलदार, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातून विविध योजनेच्या माध्यमातून तळागाळातील लोकांना गावकुसावरील शेतकऱ्यांना वाडीतांड्यावरील, गोरगरीबांना एकाचवेळी विविध योजनेच्या माध्यमातून त्यांना मदत, सहकार्य करीत असल्याचे दिसून येत आहे. शासनाकडून जिल्हाधिकाऱ्यांचे कौतुक होत आहे. विभागीय आयुक्तांकडून जिल्हाधिकाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप पडत असताना माजलगावचा तहसीलदार व उपविभागीय अधिकारी मात्र जिल्हाधिकाऱ्यांच्या चांगल्या कारभाराला सुरूंग लावत आहे. राजरोजपणे वाळू माफियासमोर लोटांगण घेत महसूल विभागातील या दोन अधिकाऱ्यांनी वाळू माफियांना जिल्हा व जिल्हा शासन प्रशासनाची वाळू ठेक्या संदर्भातील सूचना, अटी, शर्ती पायंदळी तुडवित कोट्यावधी रूपयांचे पोकलेन अनेक ठिकाणी उभा करून रात्री क्षमतेपेक्षा जास्त वाळू उपसा केला जातो. मात्र जाणून बुजून या दोन अधिकाऱ्यांनी जिल्हा प्रशासनाची प्रतिमा मलीन करण्याची आणि लाखो रूपयांचा महसूल बुडविण्याची सुपारी घेतली आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. राजरोजपणे माजलगाव महसूल विभागाने वाळू माफियासमोर लोटांगण घेत तुम्ही वाळू उपसा रात्रं दिवस करा आम्ही तुमच्या पाठीशी आहेत. जिल्हाधिकारी काही करणार नाहीत. तुमच्याकडे कोणी येणार नाही अशा पद्धतीने माजलगाव महसूल विभाग काम करत आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या दोन्ही अधिकाऱ्यांचे मोबाईल लोकेशन, यांचे दोन्ही गाडीचे ड्रायव्हर आणि आतापर्यंत केलेल्या कारवाईची चौकशी करावी आणि बीडवरून एक विशेष पथक पाठवून माजलगाव तालुक्यात मंजरथसह इतर ठिकाणी वाळू ठेके आहेत त्या ठिकाणी छापा मारून ही यंत्र सामुग्री जप्त करून गुन्हे दाखल करावेत अशी चर्चा होत आहे.

# एसटी महामंडळात १७,७४२ पदांची कंत्राटी भरती

मुंबई (सरकार):एसटी महामंडळात १७,७४२ ड्रायव्हर, कंडक्टर (गेल) आणि कर्मचाऱ्यांची कंत्राटी भरती केली जाणार आहे. महामंडळाच्या ताफ्यात नव्याने येणाऱ्या ८३०० बसेससाठी ही कंत्राटी भरती केली जाईल. नियमित कर्मचाऱ्यासाठी अर्थ खात्याकडे अर्ज पाठविण्यात आल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मात्र, तोपर्यंत या बसेस चालाव्या म्हणून ही कंत्राटी पद्धतीने भरती करावी लागत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सामान्य प्रवाशांना उत्तम सेवा देणे हेच एसटीचे तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यामुळे काम करताना चालक-वाहकांना भेडसावणाऱ्या दैनंदिन अडचणी, आगारस्तरावरील निर्णयप्रक्रिया तसेच शिस्तभंग कारवाईच्या बाबतीत न्याय्य आणि पारदर्शक पद्धतीने काम करण्याचे निर्देशही सरनाईक यांनी कर्मचारी संघटनेच्या बैठकीतून दिले आहेत.

एसटी कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्री सरनाईक यांची काल सकारात्मक चर्चा झाली. यावेळी, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रताप





सरनाईक यांनी विधान भवनात सोमवारी महत्त्वपूर्ण बैठक बोलावली होती. त्यानंतर, आज विधानसभेत बोलताना त्यांनी नव्याने कंत्राटी भरती केली जाणार असल्याचे सांगितले. लवकरच मुंबईत ३० स्लिपींग कोच बसेस असतील तर १७० बैठ्या खुर्च्यांच्या वोल्वो बसेसही दाखल होती, या दोन्ही प्रकारच्या बसेस मुंबईसाठी मागविण्यात आल्या आहेत. महामंडळाच्या ताफ्यात आम्ही लवकरच ८३०० बसेस समाविष्ट करणार आहोत. त्यासाठी, एसटी महामंडळात १७,७४२ ड्रायव्हर, कंडक्टर आणि कर्मचाऱ्यांची कंत्राटी भरती केली जाणार आहे. महामंडळाच्या ताफ्यात नव्याने येणाऱ्या ८३०० बसेससाठी ही कंत्राटी भरती केली जाईल, असे सरनाईक यांनी विधानसभेत बोलताना सांगितले.

महायुती सरकारने एसटीतील प्रवाशांबाबत गेल्या काही महिन्यांपासून अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन सेवेच्या बसेसमधून मोफत प्रवास करता येईल, अशी घोषणा केली होती. यानंतर राज्यातील महिलांना हाफ तिकिटात एसटीचा प्रवास करता येईल, अर्थात अर्ध्या तिकिटात महिलांना प्रवास करण्याची मुभा दिली. यानंतर आता एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

## महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची मोठी भरती, तबबल ५०१२ पदं भरणार

मुंबई (सरकार): राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रासाठी मोठी बातमी समोर आली आहे. अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या मोठ्या भरतीला राज्य सरकारने मंजुरी दिली असून तब्बल ५०१२ पदे भरली जाणार असल्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत केली.

२०२६-२७ च्या अर्थसंकल्पातील अनुदान मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना चंद्रकांत पाटील यांनी ही माहिती दिली. राज्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता नव्या महाविद्यालयांना अनुदानित तत्त्वावर परवानगी देण्याच्या धोरणात बदल करणे सध्या शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, विद्यमान अनुदानित महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर भरती करून शैक्षणिक दर्जा उंचावण्यावर भर दिला जाणार आहे. माहितीनुसार, राज्यातील सुमारे १२०० अनुदानित महाविद्यालयांमध्ये ५४०० प्राध्यापक पदांना मान्यता देण्यात आली आहे. तसेच विद्यापीठांमध्येही ७०० प्राध्यापकांची भरती होणार असून एकूण मिळून ६ हजारांहून अधिक पदांची भरती प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, २००१ पासून राज्यात नव्या महाविद्यालयांना विना-अनुदानित तत्त्वावर परवानगी देण्याचे धोरण लागू आहे.

# माध्यमिक शिक्षकाने आयुष्य संपवलं,घटनास्थळी चिठ्ठी सापडली

बीड (सरकार): जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अर्धा मसला येथे एका ५० वर्षीय शिक्षकाने राहत्या घरी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची मोठी घटना उघडकीस आली आहे. कैलास उघडे असं मृत शिक्षकाचं नाव असून, या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, आत्महत्या करण्यापूर्वी उघडे सरांनी एक सविस्तर नोट लिहून ठेवली असून, त्यामध्ये आपल्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या काही बाबींचा उल्लेख केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कैलास उघडे हे शिरसदेवी येथील माध्यमिक विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत होते. सकाळी बराच वेळ झाला तरी त्यांच्या घरातून कोणतीही हालचाल होत नसल्याने शेजारी राहणाऱ्या नातेवाईकांना संशय आला. त्यांनी तातडीने उघडे यांच्या घराकडे धाव घेतली. घराचा दरवाजा उघडून आत पाहिले असता, समोरच कैलास उघडे यांनी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. हा हृदयद्रावक प्रसंग पाहून नातेवाईकांनी एकच टाहो फोडला.

पोलिसांना घटनास्थळी एक नोट सापडली आहे, ज्यामध्ये उघडे सरांनी गेल्या ५-६ दिवसांत त्यांच्यासोबत घडलेल्या घडामोडींचा पाढाच वाचला आहे. यामध्ये त्यांनी शाळेतील काही सहकारी शिक्षकांकडून होणाऱ्या त्रासाचा स्पष्ट उल्लेख केला आहे. नोटमधील माहितीनुसार शाळेतील काही शिक्षकांनी त्यांना मानसिक त्रास दिला होता. पगाराशी संबंधित काही तांत्रिक अडचणी किंवा जाणीवपूर्वक अडवणूक केली जात असल्याचे संकेत दिले आहेत. आजारी असल्यामुळे त्यांनी मेडिकल रजेचा अर्ज केला होता, त्यासंदर्भातही काही अडचणी निर्माण करण्यात आल्या होत्या. चिठ्ठीत काही विशिष्ट शिक्षकांची नावे सुद्धा नमूद करण्यात आली आहेत.

या घटनेनंतर कैलास उघडे यांच्या कुटुंबियांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. 'आमच्या माणसाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करण्यात आलं आहे', असा थेट आरोप कुटुंबियांनी केला आहे. 'जोपर्यंत सुसाईड नोटमध्ये नाव असलेल्या दोषी शिक्षकांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली जात नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही', अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, सुसाईड नोट जप्त केली आहे.

पोलीस आता या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, शाळेतील कामकाज आणि संबंधित शिक्षकांकडे चौकशी होण्याची शक्यता आहे. एका गुणी शिक्षकाने अशा प्रकारे टोकाचे पाऊल उचलल्याने शैक्षणिक वर्तुळातून हळहळ व्यक्त होत आहे.

## संपादकीय

# ‘महाराष्ट्र देशाचे आर्थिक पॉवर हाऊस आणि ’स्टार्टअप कॅपिटल’, गुंतवणुकीसाठी उत्तम राज्य’

महाराष्ट्र हे देशातील सर्वात जास्त परकीय गुंतवणूक असलेले राज्य आहे. हे देशाचे आर्थिक पॉवर हाऊस असून देशाची ’स्टार्टअप कॅपिटल’ आहे. महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी उत्कृष्ट परिसंस्था असलेले राज्य आहे. त्यामुळे राज्यात ब्रिटनमधील गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मंत्रालयात ब्रिटनमधील बर्मिंगहॅमचे खासदार लियाम बर्न यांच्या नेतृत्वात खासदारांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली.

शिष्टमंडळाशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले, राज्याने ’वन ट्रिलियन डॉलर’ अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट ठेवले आहे. महाराष्ट्र हे देशाचे टेक्नॉलॉजी हब असून देशाच्या एकूण सकल घरेलू उत्पादनात राज्याचा तेरा टक्के वाटा आहे. देशात डेटा सेंटरची साठ टक्के कॅपॅसिटी ही महाराष्ट्रात आहे. आपण ब्रिटनचे खरे राजदूत असून आपल्या शिष्टमंडळाची भेट राज्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भारत आणि ब्रिटनमध्ये व्यापक आर्थिक आणि व्यापार करार झालेला आहे. हा करार महाराष्ट्र आणि ब्रिटनसाठी मैलाचा दगड ठरणारा असून कराराच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि ब्रिटनमध्येही व्यापार वृद्धिंगत होईल.

राज्याच्या प्रत्येक भागात उत्पादन क्षेत्रामध्ये मोठी गुंतवणूक येत आहे. राज्यात २०३० पर्यंत एकूण ऊर्जा गरजेपैकी ५२ टक्के ऊर्जा ही नवीनीकरणीय क्षेत्राच्या माध्यमातून निर्माण करण्याच्या ध्येयपूर्तीसाठी शासन काम करीत आहे. केंद्र शासनाने नवीन शिक्षण पद्धतीनुसार देशात विदेशी विद्यापीठांना परवानगी दिली आहे त्यानुसार महाराष्ट्र नवी मुंबई परिसरात एज्युसिटी उभारत आहे. यामध्ये विदेशी विद्यापीठांकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. एज्यूसिटीमध्ये शैक्षणिक दालने उघडण्यासाठी ब्रिटनमधील विद्यापीठांना ’ लेटर ऑफ इंटेंट’ देण्यात आले आहेत. या वर्षापासून ही विद्यापीठे अभ्यासक्रमही सुरू करीत आहेत. येथे एक लाख विद्यार्थी शिक्षण घेतील, अशी व्यवस्था करण्यात येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

ब्रिटनमधील लंडन आणि मुंबई ही शहरे आर्थिक विकासाची क्षमता लक्षात घेता साम्य असणारी आहेत. मुंबईत जागतिक फायनान्शियल सेंटर स्थापन करण्यात येणार आहे. तसेच ऑटोमोबाईल उद्योग क्षेत्रात पुणे आणि बर्मिंगहॅम शहरात साम्य असून या उद्योगांना दोन्ही शहरात समान संधी आहेत. गुंतवणुकीसाठी निर्माण केलेल्या परिसंस्थेचा उपयोग करीत ब्रिटनमधील गुंतवणूकदारांना राज्यात गुंतवणुकीच्या मोठ्या संधी आहेत. महाराष्ट्र आणि ब्रिटनमधील भागीदारी निश्चितच उज्वल भविष्यासाठी लाभकारी ठरेल, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी शिष्टमंडळाचे प्रमुख खासदार लियाम बर्न यांनी महाराष्ट्र हे केवळ देशाचे पॉवर हाऊस नाही तर, जगाचे गुंतवणूकदारांचे आकर्षण बनले असल्याचे गौरवोद्गार काढले. बैठकीत मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी अन्बळगण, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी , गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी शिष्टमंडळाला माहिती दिली. तसेच ब्रिटनचे भारतातील उच्चायुक्तामधील उपायुक्त हरजिंदर कांग, शिष्टमंडळातील जस्टिन मेडर्स, एलिसन ग्रिफिट्स, सोनिया कुमार, जॉन कूपर, सराह एडवर्ड्स, जोशुआ रेनॉल्ड्स यांनी आपली मते मांडली. बैठकीचे संचलन मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे यांनी केले.

# स्पर्शाची दुनिया सारी

स्पर्श म्हणजे जाणीव जागृतींचा काही वेळेसाठी घडलेला सहवास. कळत नकळत होणारा हाताचा हाताशी समेट, शरीराने शरीराला हलकासा दिलेला झोका त्यातून मन पाखरू पाखरू शहारत गेलेला भावनिक गुंतागुंतीचा ओझरता मखमली स्पर्श जणू काही हर्षचं. स्पर्शाला जाणीव आसक्ती जडता भौतिक सुखाच्या मोहमयी ओलाव्याची संवेदनशील छाया असं देखील म्हणता येईल. गरम, मऊ, खरखरीत, ऊबदार या भौतिक संवेदनेत स्पर्शाची सुबक व्याख्या सापडेल. नितळ त्वचेला सुखावणारी संवेदना कधी हवा, पाणी, वस्तूंच्या स्पर्शातून, तर कधी आपुलकी विश्वासाच्या समेवर भावनिक सौम्य स्पर्शाची अनुभुती देईल. सौहार्द प्रेमातून आलेली भावना सहवासायोगे मनाला आधार देत जगण्याची उभारी घेईल. नाजूक शरीराची नाजूक त्वचा स्पर्श संवेदनेचं महत्वाचं अंग असल्याने वरचेवर ते जागृत होईल. मनाला मनाची, सुखाला सुखाची, शरीराला शरीराची कायम ओढ राहील. मानवासाठी स्पर्शाचा अर्था अर्थी संबंध इथून तिथून सारखाचं असल्याने स्पर्शाच्या पहिल्याच पायरीवर असलेला मातेचा उबदार स्पर्श आठवा, जो जगातल्या सर्वोत्तम वेदनेला आश्वासक ऊब देतो. प्रसूती वेदनेनंतर ममत्व जागृती स्पर्शाने आईस पान्हा फुटतो. बाळ जन्मल्यानंतर आईचा परीस स्पर्श झऱ्यागत वाहू लागतो. लोण्यागत मऊशार कुशीतली ऊब हवीहवीशी वाटू लागते. आई म्हणजे ममत्व. आई म्हणजे जगण्याचं एकमेव ठिकाण. विश्वासाचं हक्काचं पान, अशावेळी स्पर्शाची भावना जितकी नाजूक तितकीचं ती संवेदनशील होते. भाव भावनांचे विविधांगी पदर यात अनुभवास येतात. भावनेच्या अत्युच्य अविष्काराकडे मन ओढलं जात. आयुष्यातला दुसरा माऊली स्पर्श पंढरपूरी विठोबारायाच्या पद स्पर्शाची ओढ लावणारा, भक्तीपुरात दंग करणारा. चराचरात वसलेल्या पांडुरंगाची आस अंतरंग स्पर्शून जावी या प्रतीक्षेत भक्त असतो. ज्ञानामृताच्या स्पर्शासाठी तन मन धन सगळं विसरून जातो. त्यासमयी सोहळा पालखीचा नयनी साठवावा, माऊली पदस्पर्श आशीर्वाद घ्यावा म्हणत अख्खी पंढरी दुमदुमते. जगण्याच्या असंख्य वाटांवर अनेक स्पर्शांचे कळत नकळत आधार घेत आपण पुढे जात असतो. त्या त्या वेळी ते ते स्पर्श मोलाची कामगिरी करत असतात, जेणेकरून पुढे जाऊन वेदनाही सुखावह होते. वेदनेला उमजे, मायेचा पदर... स्पर्शाची भाषा, शब्दातीत सादर. बऱ्याचं अंशी हे स्पर्श आपण गृहीतचं धरून चालतो. परंतु त्यांना मुकल्यानंतर त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आयुष्यात जाणवू लागते आणि हलक्याशा भावभरल्या स्पर्शासाठी मन आसुसते. तेव्हा काय काय दाटून येतं ठाऊक आहे का? नात्यात पडलेली वजाबाकी आठवते. भाग काढून घातलेला विचित्र गुणाकार साठू लागतो आणि कळू लागत बेरजेचं गणित. स्पर्शाची दुनिया सारी, भावार्थ सांगून जाती, स्पर्शाभोवती हळवी, वसती नाजूक नाती... पुढे स्पर्शाच्या उतरंडीमध्ये वरच्या स्थानावर ज्याची वर्णी लागते तो म्हणजे पारदर्शी मैत्रीचा नितळ आरस्पानी स्पर्श होय. ज्याला स्त्री पुरुष भेदाभेद वय, प्रांत, भाषा अशी कोणतीही भिंत अडवू शकत नाही.

मैत्री करून पाहावी आणि तेवढीचं निभवावी. दुर्बिणीतून न्याहाळावी तशी स्पर्शाची विविध रूपं समोर येऊ लागतात. स्पर्श नजरेचाही असतो. आश्वासक, आधार देणारा, जपणारा, जोजवणारा, आनंदयात्री, डोळ्यांत आसवं आणणारा, घाबरणारा, घाबरवणारा, किळसवाणा, ओंगळ नजरेचा स्पर्श प्रत्यक्ष शरीर स्पर्शापेक्षाही प्रभावी ठरतो. तान्ह्या बाळाचा स्पर्श हा पृथ्वीतलावरील सर्वात लडीवाळ मुलायम स्पर्श होय. मलिनतेच्या लाटांपासून दूर असलेला पवित्र निसर्गाचा स्पर्श. थंडीच्या दिवसात अंगाशी लगट करणारे बोचरे वारे आठवून पाहा. आठवून पाहा पावसाच्या पहिल्या थेंबाने रोमांचित झालेले मन...अख्खा श्रावण मनासह शरीर कार्यान्वित करतो. नेहमी वरच्या क्रमांकावर असलेला, दाटीवाटीच्या युगल मिठीत, लग्नगाठ बांधण्यासाठी सरसावलेला चोर स्पर्श. प्रेमाची भेट प्रेमाच्या गाठी ओलावा संपताच उरत नाहीत पाठी... आठवांचा खेळ उगा मागे उरतो, रागरूसव्यात जो तो गुदमरतो... त्याच्या-तिच्या सानिध्यातील आठवून पाहा संध्याकाळ... पहिली भेट, मावळतीचा सूर्य... बोचणारा वारा, नजर गुपित, घट्ट धरलेला हात! मनीची भाषा, अवगेल का त्याला? तूच माझी राणी, तो त्या दिवशी म्हणाला... हाती तुझा हात दे काहीतरी गुणगुणला... तू फक्त हो म्हण, तो हरपला... हीच माझी ओढ अन्, हाच खरा जिवलग... मी ही लाजून हो म्हंटल जरा! तो म्हणाला, भेटीत हवा विश्वास ज्याने वाढेल सहवास... सहवासावर रचू सुखाचा संसार... स्पर्श करता वेलीला येई आकार. तूच माझी राणी अन् मी तुझा सखा... सुखी जीवनात सहवासी स्पर्श हवा.



निसर्गाने स्पर्शाची एक सुंदर देणगी आपल्याला बहाल केलेली आहे. स्पर्श म्हणजे अभिव्यक्तीचे एक सशक्त माध्यम. विशेष उल्लेखनीय म्हणजे घरातील, समाजातील, वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना कपडालत्ता, औषध, पैसा, अन्नपाणी या गोष्टी पलीकडे आसं असते मायेच्या संवादाची.

आपले म्हणणे मांडण्याची, दुसऱ्याचे ऐकण्याची आणि सर्वांच्या पलीकडे एक खोल आस असते स्पर्शाची. घरातील ज्येष्ठांना असा स्पर्श आपण मागे कधी केलाय का? आठवून बघा. नसेल ना आठवत...! तर एक गोष्ट करा. त्यांच्याजवळ बसा. त्यांचा हात आपल्या हातात घ्या. डोक्यावरून मायेने हात फिरवा, आणि पहा साधे वाटणारे स्पर्श काय काय किमया करतात ते. निसटून गेलेल्या स्पर्शाचे सुरेख पैलू अनुभवून तर पहा. केवळ स्पर्शाने चमत्कार झाल्याची अनेक उदाहरणे देता येतील. विस्मृतीत गेलेल्या स्पर्श अनुभूतीच्या आठवणीत आपला दिवस गोड जावा म्हणून हाती घेतलेल्या मोरपंख ललितबंध लिखाणावरील दौतस्पर्श आपल्या सेवेशी सादर आहे.

# वजन कमी करण्यासाठी अंजीरचे फायदे, दररोज किती खावे!

वजन कमी करण्यासाठी अंजीरचे फायदे: वजन कमी करणे कठीण वाटू शकते, परंतु योग्य सुपरफूड्स ते सोपे करू शकतात. अंजीर हे एक असे फळ आहे जे केवळ स्वादिष्टच नाही तर वजन कमी करण्यासाठी देखील अविश्वसनीयपणे उपयुक्त आहे. फायबरने समृद्ध, ते भूक नियंत्रित करतात आणि चयापचय वाढवतात. जर तुम्हाला प्रश्न पडत असेल की वजन कमी करण्यासाठी तुम्ही दररोज किती अंजीर खावेत जाणून घेऊ या. फायदे जाणून घ्या.

**बद्धकोष्ठता दूर करते :** फायबरने समृद्ध, तुम्हाला जास्त काळ पोट भरलेले ठेवते अंजीर हे फायबरचा चांगला स्रोत आहे. फायबरयुक्त पदार्थ पचन सुधारतात आणि भूक नियंत्रित करण्यास मदत करतात. पोट जास्त वेळ भरलेले राहिल्यास वारंवार खाण्याची इच्छा कमी होते, ज्यामुळे कॅलरीजचे प्रमाण कमी होते. अंजीर बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी देखील उपयुक्त मानले जातात.

**पचनसंस्था निरोगी ठेवते :** वजन कमी करण्यात चांगले



पचन महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. अंजीर आतड्यांचे आरोग्य राखण्यास मदत करतात आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात. जेव्हा पचन चांगले असते तेव्हा शरीर पोषक तत्वांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करू शकते.

**अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध:** अंजीरमधील अँटीऑक्सिडंट्स शरीराला मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचवतात. हे घटक शरीराला आतून निरोगी ठेवतात, ज्यामुळे संतुलित आणि सुरक्षित वजन कमी करण्याची प्रक्रिया होते.

**ऊर्जेची पातळी राखते:** वजन कमी होण्यासोबत अनेकदा अशक्तपणा आणि थकवा येतो. अंजीरमध्ये कॅल्शियम, लोह, पोटॅशियम, फॉस्फरस आणि मॅग्नेशियम सारखी आवश्यक खनिजे असतात, जी ऊर्जा प्रदान करण्यास मदत करतात. यामुळे आहाराचे पालन करणे सोपे होते.

**चयापचय राखण्यास मदत:** अंजीरमधील जीवनसत्त्वे आणि खनिजे सक्रिय चयापचय राखण्यास मदत करतात. चांगले चयापचय म्हणजे शरीर अधिक कार्यक्षमतेने कॅलरीज बर्न करते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

## भारताच्या राष्ट्रध्वजावर १० वाक्ये

भारताचा वर्तमान ध्वज २२ जुलै १९४७ रोजी अनेक बदलांनंतर स्वीकारण्यात आला. तेव्हापासून ते आपल्या देशाच्या आणि नागरिकांच्या सन्मानाचे आणि अभिमानाचे प्रतीक आहे. भारताचा राष्ट्रध्वज देशाचे स्वातंत्र्य आणि लोकशाही दर्शवतो. देशाच्या अखंडतेचे ते निदर्शक आहे. आज आपण या लेखाद्वारे आपल्या राष्ट्रध्वजाशी संबंधित काही रंजक गोष्टी जाणून घेणार आहोत.

१) भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा म्हणून ओळखला जातो.२) भारताचा राष्ट्रध्वज २२ जुलै १९४७ रोजी संविधान सभेने स्वीकारला.

३) भारताचा राष्ट्रध्वज तीन रंगांनी बनलेला आहे.४) भारताच्या राष्ट्रध्वजात भगवा, पांढरा आणि हिरवा रंग आहे.५) ध्वजाच्या मध्यभागी निळ्या रंगाचे अशोक चक्र आहे, ज्याला २४ प्रवक्ते आहेत. ५) राष्ट्रध्वज हे भारताच्या अभिमानाचे प्रतिक आहे. ६) राष्ट्रध्वजाला आपण नेहमीच उच्च स्थान देऊन त्याचा आदर करतो.७) पिंगली व्यंकय्या यांनी सर्वप्रथम भारताचा स्वतःचा ध्वज असावा असे सुचवले. ८) भारताचा राष्ट्रध्वज फक्त खादी आणि कॉटन फॅब्रिकपासून बनवला जातो. ९) भारताच्या ध्वजाने अनेक टप्पे पार केल्यानंतर त्याचे सध्याचे स्वरूप प्राप्त केले.१०) शाळांमध्ये राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रगीत गायले जाते.

# आज मला हसू कधी आलं?

खूप वेळा असं होतं. दिवस संपतो, पण आपण काय अनुभवलं, याचा विचारच होत नाही. काय केलं, काय राहिलं, काय जमलं हे सगळं लक्षात राहतं. पण आज मन हलकं कधी झालं, हे मात्र निसटून जातं.

खरं तर हसू फार मोठ्या गोष्टीतून येत नाही. ते एखाद्या क्षणात अलगद उमटतं. सकाळी चहा करताना उकळलेलं दूध ओसंडून वाहिलं आणि स्वतःवरच हसू आलं-तो क्षण. आरशात केस नीट न बसल्यावर, असू दे म्हणत पुढे निघून गेलेला तो क्षण. घरात कुणीतरी सहज केलेली टिप्पणी आणि वातावरण थोडंसं हलकं झालेला तो क्षण. हे क्षण फार गोंगाट करत नाहीत. ते स्वतःहून लक्ष वेधत नाहीत. आपल्याला थांबून पाहावं लागतं. स्त्रीचं आयुष्य अनेक धाग्यांनी विणलेलं असतं. कुणासाठी तरी काळजी, कुणासाठी तरी धावपळ, कुणासाठी तरी संयम. या सगळ्यात हसणं कधी कधी परवडत नाही. नंतर हसू असं म्हणत आपण ते पुढे ढकलतो. पण



मन मात्र तेच हसू शोधत असतं- दिवसातल्या एखाद्या कोपऱ्यात. कधी एखादं जुनं गाणं अचानक कानावर पडतं आणि नकळत ओठांवर स्मित येतं. कधी कुणी आपल्या नावानं हाक मारतो आणि क्षणभर आपल्याला आपण असतो असं वाटतं. कधी मुलांचं निरागस बोलणं, कधी मैत्रिणीचा साधा मेसेज...आठवण आली म्हणून. हसू म्हणजे सगळं विसरून टाकणं नाही. हसू म्हणजे दुःख नाकारणंही नाही. हसू म्हणजे जड दिवसातला एक हलका श्वास. आज हसू आलं असेल, तर ते लक्षात ठेवा. आज हसू आलं नसेल, तरी स्वतःला कमी लेखू नका. काही दिवस फक्त शांततेचे असतात. त्या शांततेलाही आपली जागा आहे. मनातलं लिहिते ही जागा मोठ्या शब्दांची नाही. इथे साधेपणालाच मान आहे. आज फक्त एक ओळ लिहिली तरी चालेल. आज मला हसू आलं आणि त्यामागचं कारण. कारण उद्या जेव्हा दिवस थोडा जड वाटेल, तेव्हा हेच छोटे क्षण आपल्याला आठवतील. तेच आठवण करून देतील. आपण अजूनही हसू शकतो. आपण अजूनही मनापासून जगतो. आजचं हसू फार काळ टिकेलच असं नाही. पण आजच्या दिवसाला ते पुरेसं आहे. आज मला हसू कधी आलं? हा प्रश्न स्वतःला विचारू आणि उत्तर मनासारखं लिहू.

# गर्भधारणे दरम्यान योगासन करताना गोष्टी लक्षात ठेवा


**१ कठीण आसन करू नये-** गर्भधारणेच्या सुरुवातीस आपल्याला या गोष्टीची काळजी घ्यावयाची आहे की आपण कोणतेही कठीण आसन करू नका. किंवा असे कोणते ही आसन ज्यांना करताना ते आपल्याला अवघड वाटतील करू नका. ओटीपोटावर जोर पडणारे आसन अजिबात करू नका. एखाद्या योग प्रशिक्षकाचा सल्ला घ्या. स्वतःहून चुकीचे आसन करू नका अन्यथा आपण केलेल्या एखादे चुकीचे आसन देखील आपल्या शरीरास हानी देऊ शकतात. **२) उभे असणारे आसन करावे –** गरोदरपण्याच्या सुरुवातीच्या तीन महिन्या दरम्यान आपल्याला नियमित उभे असणारे आसन करावे. हे आसन केल्यानं आपल्या पायाचे स्नायू बळकट होतील आणि शरीरात रक्त विसरणं चांगले होईल,



वारवार पायात येणारी सूज देखील कमी होइल आणि शरीरात ऊर्जा टिकून राहील ज्यामुळे पुन्हा पुन्हा आळशी पणा जाणवणार नाही. **३) १० ते १५ आठवडे आसन करू नका-** गरोदरपणातील मध्यम काळ आई आणि बाळा दोघांसाठी महत्त्वाचा असतो. बऱ्याच प्रकरणांमध्ये जिथे आई कमकुवत असते, डॉक्टर त्यावेळी बेड रेस्ट घेण्याचा सल्ला देतात. परंतु आवश्यक आहे की या काळात मानसिक आरोग्य चांगले असणे महत्त्वाचे आहे. जरी आपण कोणतेही आसन केले नाही तरी सुखासनात बसून थोड्या वेळ ध्यान करून प्राणायाम करावं. असं केल्यानं आपल्याला आरोग्याशी निगडित फायदे होतील. **४) आपल्या क्षमतेपक्षा कमी व्यायाम करा-** सामान्यपणे जेव्हा आपण योगासन करतो त्यावेळी आपल्या शरीरातील कोणत्याही भागाला क्षमतेनुसारच वळवतो किंवा कधीतरी क्षमतेपेक्षा जास्त करतो. परंतु गरोदरपणात असं काही करायचे नाही आपल्या क्षमतेपेक्षा कमीच करायचे आहे. असं केल्याने आपल्या शरीराला आणि बाळाला कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही.

# तणाव आणि नैराश्य दूर करण्यासाठी भुजंगासन करा

नैराश्य आणि तणावापासून मुक्ती मिळते. हे भुंजगासन नियमितपणे केल्यास नैराश्य आणि तणावातून आराम मिळू शकतो. हे योग आसन नैराश्याची लक्षणे कमी करण्यास आणि वात दोष कमी करण्यास देखील मदत करू शकते. **संधिवात-** सांधेदुखीची समस्या असेल तर भुजंगासनाचा सराव करू शकतो. हे योगासन केल्याने शरीराला आराम मिळतो. हा योग उती आणि पेशींना निरोगी ठेवतो. सांधेदुखीची समस्या असल्यास भुजंगासनाचा नियमित सराव करा. **थॉयराइड-**भुजंगासन घसा आणि थायरॉईड ग्रंथीला उत्तेजित करण्यासाठी उपयुक्त मानले जाते. थायरॉईडची समस्या असेल तर भुजंगासन करू शकता, कारण हे योग आसन हार्मोन्सच्या स्रावाला संतुलित ठेवण्यास मदत करते ज्यामुळे थायरॉईडची समस्या कमी होऊ शकते. **कसे कराल-** यासाठी आधी तुम्हाला जमिनीवर झोपावे नंतर तुमचे दोन्ही तळवे खांद्याच्या रुंदीवर जमिनीवर ठेवावे. आता तुम्हाला शरीराचा खालचा भाग जमिनीवर ठेवा .श्वास घ्या छाती जमिनीवरून उचलून छताकडे पहाश्वास सोडताना, शरीर परत जमिनीवर आणा.



# काळे तीळ हृदयासाठी फायदेशीर आहे

**मेंदूचे आरोग्य सुधारते-** काळ्या तिळामध्ये मॅग्नेशियम, लोह आणि जस्त यांसारखे अनेक आवश्यक पोषक घटक आढळतात. अशा परिस्थितीत, त्यांच्या सेवनाने स्मरणशक्ती, एकाग्रता आणि एकूण मेंदूचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. **पचन सुधारते-** काळ्या तिळात भरपूर फायबर असते आणि हिवाळ्यात अक्रोड तुम्हाला निरोगी ठेवते, जाणून घ्या रिकाम्या पोटी खाण्याचे ५ मोठे फायदे, जे तुमची पचनशक्ती सुधारण्यास मदत करतात. आहारात त्याचा समावेश केल्याने बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो आणि आतड्यांतील निरोगी मायक्रोबायोमला प्रोत्साहन मिळते.

**हाडांसाठी फायदेशीर –** कॅल्शियम भरपूर असल्याने काळे तीळ तुमच्या हाडांसाठीही खूप फायदेशीर आहेत. हाडे मजबूत आणि निरोगी ठेवण्यासाठी कॅल्शियम महत्वाचे आहे, ऑस्टियोपोरोसिस सारख्या समस्या टाळण्यास मदत करते. **हृदय निरोगी ठेवते-** हिवाळ्यात आपल्या आहारात काळ्या तिळाचा समावेश केल्यास रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होण्यास मदत होते.

**अँटी एजिंग गुणधर्म –**वृद्धत्वाच्या लक्षणांनी हैराण असाल तर काळे तीळ तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरतील. त्यांच्यामध्ये असलेले शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्स मुक्त रॅडिकल्सशी लढण्यास, ऑक्सिडेटिव्ह तणाव टाळण्यास आणि वृद्धत्वाची प्रक्रिया कमी करण्यास मदत करतात.

## विशेष वृत्त

# डॉ.महेश कुमार यांच्या आकडा चित्रपटाचे चित्रीकरण संपन्न



**बीड ( प्रतिनिधी) :** मराठी चित्रपट सृष्टी सहित बॉलीवूडमध्ये देखील चर्चेचा विषय असलेला बहुचर्चित चित्रपट आकडा चे चित्रीकरण गेल्या महिन्याभरापासून चाळीसगाव परिसरामध्ये सुरू होते. आमदार मंगेश चव्हाण यांच्या हस्ते मुहूर्त पार पडलेल्या या चित्रपटाचे प्रचंड कुतूहल खान्देश च्या जनतेमध्ये असल्यामुळे चित्रीकरण पाहायलाच मोठा जनसमुदाय येत होता. खानदेश चे प्रसिद्ध नेतृत्व म्हणून माजी खासदार उन्मेश पाटील यांच्याकडे पाहिले जाते, नुकतेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सर्व पदाधिकाऱ्यांसोबत शिवसेनेत प्रवेश केलेले उन्मेश पाटील यांनी फिल्मस्टार डॉ. महेश कुमार यांच्या तेजस्वी अभिनयाचे कौतुक करत सर्व युनिटला महेंद्र खिल्लारे लिखित आकडा चित्रपटाच्या पुढील प्रवासाला शुभेच्छा दिल्या. मुळशी पॅटर्न फेम अभिनेत्री दीप्ती धोत्रे आणि मराठवाड्याचा रांगडा हिरो डॉ. महेश कुमार ही नवी जोडी प्रथमच या चित्रपटामधून एकत्र पाहायला मिळणार आहे. राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त दिग्दर्शक शिवाजी लोटन पाटील, बॉलीवूडचे सुप्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर रमनी रंजन दास, हिंदी चित्रपट आणि मालिका चे निर्माते सौरभ तिवारी, समीर रेडीज, आनंद सिंग, पलकी मल्होत्रा, दानिश मन्सूरी अशी मोठमोठी नावे आकडा चित्रपटात एकत्र आली असल्यामुळे चित्रपट उद्योग विश्वामध्ये देखील या बिग बजेट चित्रपटा बाबत मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

# अंबाजोगाईत प्रशिक्षिका माही परमार यांचा गौरव

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या वतीने क्रिकेट प्रशिक्षिका तथा क्रीडा पत्रकार माही परमार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. अंबाजोगाईत महिला क्रिकेटची मुहूर्तमेढ रोखण्यात त्यांचा मोठा वाटा असून, त्यांच्या कार्यामुळे अनेक महिला खेळाडूंना प्रेरणा मिळाली आहे, असे प्रतिपादन डॉ. राजेश इंगोले यांनी यावेळी केले. माही परमार या महाराष्ट्रात महिला क्रिकेटचा प्रसार आणि प्रशिक्षणाचे कार्य त्या जिद्दीने करत आहेत. त्यांच्या याच अनुभवाचा फायदा स्थानिक खेळाडूंना व्हावा, या उद्देशाने हा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी राजकिशोर मोदी, निलेश मुथा, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, प्रेमलता मूथा, अनितोष कातकडे, अविनाश साठे, साहेबा लोंढे, जयकुमार लोढा, सतीश बालुतकर, डॉ. संदीप जैन, अक्षय परदेशी, अभिजित जोधळे, प्रतीक बोथरा आणि ऋषभ रांका या मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहित परमार यांनी केले, सूत्रसंचालन अशोक तापडिया यांनी तर आभार प्रदर्शन निलेश मुथा यांनी केले.

# पोलीस पाटील भरतीनंतर तक्रारींचा ओघ

**पाटोदा(प्रतिनिधी):** पाटोदा तालुक्यातील रिक्त असलेल्या पोलीस पाटील भरती प्रक्रिये संदर्भात भरतीचा निकाल जाहीर झाल्यानंतर तक्रारी केल्या जाऊ लागले आहेत. तालुक्यातील निवडुंगा येथील पोलीस पाटील निवडी संदर्भात निवड समितीने निकाल राखून ठेवला आहे. या ठिकाणी सर्वाधिक गुण असलेल्या उमेदवारासंदर्भात उमेदवाराच्या पतीने जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार केली आहे. उपविभागीय कार्यालयाने जाहीर केल्यानुसार निवडुंगा गावच्या पोलीस पाटील पदासाठी मिसाळ कांताबाई बाबासाहेब व गुंड अनिता अंकुश अशा दोन उमेदवारांची नावे निकालात समाविष्ट आहेत. पैकी मिसाळ कांताबाई यांना ६४ गुण आहेत, तर गुंड अनिता यांना ५६ गुण आहेत. निवड प्रक्रियेत निकाल राखून ठेवण्यात आलेला आहे. दरम्यान मिसाळ कांताबाई या उमेदवाराच्या पतीने जिल्हाधिकाऱ्यांच्या नावे उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. तक्रारी मध्ये कांताबाई यांचे पती प्रवीण वारे रा. लिंबोडी ता. आष्टी यांनी म्हटले आहे की, त्यांचा २०१६ मध्ये विवाह झालेला आहे. कांताबाई यांनी जाणीवपूर्वक वडीलाच्या नावे अर्ज केला आहे. शिवाय पाटोदा न्यायालयात केसेस चालू आहेत. कुर्ला नेहरूनगर येथे राहत असताना कांताबाई यांच्या नावे पोलिसात गुन्हा दाखल आहे. अद्याप फारकत प्रक्रिया झालेली नाही. असे आक्षेप नोंदवत कांताबाई यांची निवड करू नये असे तक्रारीत म्हटले आहे.

# शासनाच्या सर्व योजना गरजु लाभार्थींना देण्यासाठी गाव पातळीवर एकता हवी–आयुक्त पापळकर

**बीड (प्रतिनिधी):–** शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना सुरू आहेत त्या गरजु लाभार्थींना मिळण्यासाठी सरपंच आणि गावकऱ्यांनी आपले राजकीय हेवेदावे बाजूला सारून गावात एकता निर्माण करावी,आपला गाव आपला विकास आपणच करु शकतो, कोणी येईल आमचा उद्धार करील या आशेवर बसण्यापेक्षा आपण इतरांच्या मदतीने शासकीय योजना आपल्या ला मिळे पर्यंत स्वस्त बसू नये असे प्रतिपादन आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी मौजे तळेगाव, तालुका बीड येथील छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले आहे. याबाबत सविस्तर माहिती असी की, शनिवारी सकाळी दहा वाजता राजुरी महसूल मंडळ अंतर्गत तळेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित केले होते.जिल्हाअधिकारी विवेक जॉन्सन , जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, यांनी तळेगाव शिंदमळ्यातील पारधी समाजातील वस्ती वर जाऊन शबरी घरकुल आदेश लाभार्थींना दिले.त्यानंतर तळेगाव या ठिकाणी समाधान शिबीराच्या माध्यमातून रहिवासी प्रमाणपत्र पत्र, आयुष्यमान भारत कार्ड, जातीचे प्रमाणपत्र, शेतकऱ्यांना ट्रॅक्टर,पि.एम किसान योजना, नवमतदार आदी लाभार्थी यांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला.याप्रसंगी गावच्या महीला सरपंच अश्विनी ताई उध्दव घोलप, उपविभागीय अधिकारी जाधव म्याडम, गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप, तहसीलदार शेळके,नायब तहसीलदार प्रशांत जाधवर,गट शिक्षणाधिकारी समंदर खान साहेब, बीड जिल्हा कृषी अधिकारी साळवे,ग्राम महसूल अधिकारी श्रीमती सानप, राष्ट्रवादी काँग्रेस चे बीड जिल्हा अध्यक्ष राजेंद्र मस्के, राष्ट्रवादी काँग्रेस चे बळीराम गवते पाटील, भारतीय जनता पार्टी चे सर्जेराव तांदळे,ग्रामपंचायत अधिकारी चाळक, मंडळ अधिकारी येवले,केंद्र प्रमुख सुमेध जोगदंड, तळेगाव शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर सरवदे, केंद्र प्रमुख तवरे सर,आदी शासकीय अधिकारी कर्मचारी यांनी सायंकाळी पाच वाजेपर्यंत आपल्या शासकीय योजनेचे स्टॉल सुरू ठेवले.तळेगाव,नवगण राजुरी,मंजीरी येथील शाळकरी विद्यार्थ्यांनी स्वागत गीत लेझीम, लोक गीत नृत्य सादर केले,राज मोहम्मद सय्यद सर दिग्दर्शित गोंधळ गीत प्रभावी ठरले.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शन विषयक प्रश्न सोडवणे ही काळाची गरज-इंजि.मनोहर पोकळे

## महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचा जिल्हास्तरीय मेळावा संपन्न





**बीड (प्रतिनिधी):** शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या कृतिशील व्यक्तींना एकत्र आणून त्यांच्या दीर्घ सेवेतील अनुभवाचा लाभ सामान्य नागरिकांना मिळावा व त्यांच्या स्वतःच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी ते कार्यरत राहावे या उद्देशाने कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेची स्थापना करण्यात आली असून या संघटनेत जास्तीत जास्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष इंजि.मनोहर पोकळे यांनी केले आहे..

बीड येथील सामाजिक न्याय भवन येथे महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचा जिल्हास्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला होता त्याप्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष जालिंदर भोरे प्राचार्य सविता शेटे सेवानिवृत्त मुकाअ अशोकराव कोल्हे डॉ.वशिष्ठ जाधव,ठाणे जिल्हा अध्यक्ष लेखक दिग्दर्शक नाट्यकर्मी मोहन पवार,संजय केंद्रे, प्रसार प्रमुख तुकाराम पवार- ठाकूर, कार्याध्यक्ष गौतम चोपडे, कांचन गायकवाड प्रल्हाद जावळे ,शिवाजी बांगर, ,प्रवीण शेटे, रमेश ठाकूर इ मान्यवर उपस्थित होते. सेवानिवृत्तांचे पेन्शन विषयक प्रश्न सोडवणे, त्यांच्या सुरक्षिततेची व स्वास्थ्याची काळजी घेणे, ही कामे प्राधान्याने करण्यात येत असून त्यांच्या वैयक्तिक अडीअडचणीवरही मार्गदर्शन करून ज्येष्ठांची आरोग्य तपासणी, व्याख्याने, परिसंवाद चर्चासत्रे, संमेलन, आयोजित करणे सभासदांचे हितसंबंध वृद्धिंगत व्हावे या अशा दृष्टीने सामाजिक बांधिलकी म्हणून संघटना सर्वांच्या पाठीशी उभी राहणार आहे. राज्य शासनाने संपूर्ण देशाचे बरोबरीने देय ठरत असलेल्या सहावा व सातवा वेतन आयोगाशी निगडित सर्व प्रकारच्या हक्कांचे संपूर्ण फायदे देण्याचे नाकारल्याने मागील सोळा वर्षापासून गंभीर स्वरूपाचे अन्याय होत आहे. १ एक जानेवारी २०१६ पूर्वी निवृत्त व वयाचे ६४ वर्षे पूर्ण झालेल्या व त्यापेक्षा जास्त वर्ष पूर्ण झालेल्या सर्व पेन्शनधारकांना सुधारित बेसिक पेन्शन योजना मिळवून देणे ,वय ८० वर्षे व त्यावरील वयाच्या निवृत्तीवेतनधारकांना मिळणाऱ्या अतिरिक्त निवृत्तीवेतनाची जर केंद्राप्रमाणे व इतर राज्याप्रमाणे सुधारित करणे ,निवृत्तीवेतन अंश राशीकरण पुनर स्थापना ज्कालावधी एका वर्षा ऐवजी बारा वर्षे करणे ,आदी मागण्या संघटनेने शासनाकडे केलेले आहेत. संघटनेचे हात बळकट करण्यासाठी व संघटनेने हाती घेतलेल्या महाराष्ट्र राज्य पेन्शनराचे हिताच्या हिताचे कामाच्या मोहिमेत सहभागी व्हावे असे आव्हान त्यांनी याप्रसंगी केले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. व मान्यवरांचं स्वागत करण्यात आले .याप्रसंगी प्राचार्य सविता शेटे, ठाणे जिल्हाध्यक्ष मनोहर पवार ,अशोकराव कोल्हे आदींनी मार्गदर्शक भाषणे केली. महिला दिनाचे औचित्य साधून याप्रसंगी प्राचार्य सविता शेटे, जिव्हाळा केंद्राच्या केंद्र संचालिका छाया सर्वदे ,व सुनंदा कुलकर्णी यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा प्रास्ताविक डी.जी.तांदळे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम चोपडे यांनी तर आभार प्रदर्शन कांचन गायकवाड यांनी मानले. या मेळाव्यास मंत्रालयातील स्वीय सहाय्यक प्रवीण शेटे अर्जुन कुमावत इंजि. फुटाणे दिवेकर, बेद्रे सर, सय्यद रफीयोद्दीन,प्रकाश करपे,या नारायण जाधव ,सुरेश पवार, सुरेश खंदारे, सुधाकर घुबडे , शिवाजी कोल्हे,शहाजी बोराडे ,राजकुमार कदम ,दत्तू डोळस,उत्तम पवार, इ.उपस्थित होते. जिल्हा भरातून मोठया संख्येने सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते.

# शेतकऱ्याचे डोके फोडले

**केज (प्रतिनिधी):** देवगाव (ता. केज) येथील रणजित चंद्रवदन मुंडे (वय ५१) हे शेतकऱ्याची पत्नी व मुले पुण्याला वास्तव्यास असून त्यांनी गावातील शिवाजी मुंडे यांच्या दोन रूम किरायाने केल्या आहेत. १५ मार्च रोजी रात्री आठ वाजता घरमालकाचा चुलत मेव्हणा विकास महादेव नागरगोजे हा दारूच्या नशेत त्यांच्याकडे आला. त्याने तु माझ्या बहिणीच्या घरी सामान ठेवण्यासाठी किरायाने केलेल्या रुमची चावी दे म्हणाला. त्यांनी त्याला चावी काढून दिली. त्यांनतर रणजित मुंडे हे आईच्या घराकडे निघाले असता विकास नागरगोजे याने विनाकारण शिवीगाळ करून डोक्यात दगड मारून डोके फोडले. १६ मार्च रोजी त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून विकास नागरगोजे विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सहाय्यक फौजदार बाबासाहेब सानप हे तपास करत आहेत.

# मुलगी जन्माला आल्यास १० हजार रुपये खात्यावर जमा करणार : खा. बजरंग सोनवणे

**केज (प्रतिनिधी):** येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१, आनंदगाव (ता. केज) येथे सन २०२५-२६ च्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या निमित्ताने आयोजित स्नेहभोजन कार्यक्रमात येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन तथा खा. बजरंग सोनवणे यांनी कर्मचारी व सभासदांसाठी महत्त्वपूर्ण आणि समाजाभिमुख घोषणा केली.

कारखान्याशी संबंधित कर्मचारी तसेच सभासदांच्या घरी मुलगी जन्माला आल्यास त्या कुटुंबाच्या खात्यावर १० हजार रुपये जमा करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. मुलींचा जन्म साजरा व्हावा, तसेच समाजात मुलींबाबत सकारात्मक विचार वाढावा आणि कन्या जन्माबाबत जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने हा निर्णय घेतल्याचे खा. सोनवणे यांनी स्पष्ट केले. समाजात मुलगा-मुलगी भेद न करता दोघांनाही समान मान मिळायला हवा. मुली आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्यामुळे मुलींच्या जन्माचे स्वागत व्हावे आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या निर्णयामुळे कारखान्याच्या सभासद व कर्मचारी वर्गात मुलींच्या जन्माला प्रोत्साहन मिळेल आणि समाजात सकारात्मक संदेश जाईल,

असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, आनंदगाव येथील येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१ येथे सन २०२५-२६ च्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ व स्नेहभोजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात कारखान्याच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी कारखान्याच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी, कर्मचारी तसेच सर्व संबंधितांचे खा. सोनवणे यांनी मनापासून आभार मानले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या २ सहकार्यामुळेच कारखान्याची प्रगती शक्य होत असून शेतकरी, कर्मचारी आणि व्यवस्थापन यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे कारखान्याने यशस्वी गळीत हंगाम पूर्ण केला आहे. आगामी काळातही अशीच साथ लाभेल आणि कारखाना अधिक प्रगती करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास कारखान्याचे पदाधिकारी, विभाग प्रमुख, सभासद, कर्मचारी तसेच ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खा. सोनवणे यांच्या या घोषणेचे उपस्थितांकडून स्वागत करण्यात आले असून हा निर्णय समाजासाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली

# विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा विद्यार्थी प्रद्युम्न घुलेला तृतीय पारितोषीक

**बीड (प्रतिनिधी):** ज्येष्ठ शिक्षक नेते स्व.द.बा घुमरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व व विज्ञान प्रदर्शन स्पर्धा २०२६ प्रदर्शनामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा विद्यार्थी घुले प्रद्युम्न तृतीय पारितोषिक प्राप्त बीड येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा विद्यार्थी चि. प्रद्युम्न श्रीहरी घुले या विद्यार्थ्याने बीड येथील द.बा. घुमरे पब्लिक स्कूल या विद्यालयामध्ये आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये



तृतीय पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल त्याचे आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष श्री. धुतालमल, सचिव ड. व्ही बी. मगर सर्व संचालक आणि या विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बी .ए .हावळे यांनी अभिनंदन केले असून पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. चि. प्रद्युम्न श्रीहरी घुले या विद्यार्थ्यास सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि २१०० रू पारितोषिक प्राप्त झाले आहे. या विद्यार्थ्याचे मार्गदर्शक विज्ञान शिक्षिका श्रीमती. एन .जी. मुंडे आणि श्री. डब्ल्यू .एस .वाघमारे यांनी अमूल्य मार्गदर्शन केले होते. या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन आनंद छात्रालयाचे अधिक्षक श्री. डी .व्ही. खरसाडे, समर्थ गुरुकुल चे अधिक्षक श्री. रविराज घुले, विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद सर्व शिक्षक इतर कर्मचारी व पालक यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बीडला रामकथा, रथयात्रेसह रामनवमीचे आयोजन

**बीड (प्रतिनिधी):** येथील स्वराज्यनगर भागातील

मराठवाड्यात एकमेव असलेल्या जगन्नाथ मंदिराच्या वर्धानदिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे. दि. १९ मार्चपासून दुपारी ३ ते ६ या वेळेत रामकथा प्रारंभ होणार असून दि.२५ मार्च रोजी कथेची सांगता होणार आहे. याच दिवशी कथा समाप्ती नंतर सायंकाळी ४ वाजता भव्य जगन्नाथ रथयत्रा काढण्यात येणार आहे. या रथयात्रेत मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले असून दि.२६ मार्च गुरुवार रोजी म्उत्साहात रामनवमी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष गोलोक वृंदावन दास महाराज व मंदीर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# हिंगलाज माता प्रगटदिननिमित्त कार्यक्रम

**वडवणी (प्रतिनिधी):** अखिल भारतीय भावसार क्षत्रिय समाजाची कुलदेवता असलेल्या हिंगलाज माता प्रकट दिनानिमित्त मंगळवार दि.१७ मार्च रोजी वडवणी येथे विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

भावसार क्षत्रिय समाजात विशेष महत्त्व आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा प्रकट दिन देशभरासह वडवणी शहरात भक्तिभावाने साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने वडवणी येथील श्री हिंगलाज माता मंदिरात सकाळी देवीची पूजा, आहे. पाकिस्तानातील प्रांतात बलुचिस्तान असलेल्या हिंगलाज मातेला महाअभिषेक व धार्मिक विधी पार पडणार आहेत. त्यानंतर देवीची पालखी शहरातून वाजतगाजत मिरवणुकीने काढण्यात येणार आहे. मिरवणुकीनंतर मंदिर परिसरात महाआरती होईल व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. याचबरोबर सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम, कीर्तन-भजन, रक्तदान शिबिर, तसेच महिलांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांना भावसार समाज बांधवांसह सर्व



समाजातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वडवणी भावसार समाजाच्या वतीने करण्यात आले

# बीड जिल्हा प्रशासनाचा गलथान कारभार

## वृत्तपत्रांच्या जाहिरातींचे ५० लाख रुपयांचे निधी मागणी प्रस्ताव मंत्रालयात 'धूळखात' पडून

### १० वर्षांपासून बिले थकीत; त्रुटींच्या नावाखाली भू-संपादन कार्यालयाची दिरंगाई

बीड (सरकार) बीड जिल्ह्यातील विविध भू-संपादन कार्यालयामार्फत स्थानिक वृत्तपत्रांना देण्यात आलेल्या जाहिरातींचे सुमारे ५० लाख रुपयांचे देयके गेल्या दहा वर्षांपासून प्रलंबित आहेत. जिल्हा प्रशासनाने पाठपुरावा करण्यात केलेल्या हलगर्जीपणामुळे निधी मागणीचे प्रस्ताव मंत्रालयात तांत्रिक त्रुटींच्या नावाखाली अडकून पडले असून, याचा मोठा फटका जिल्ह्यातील वृत्तपत्रांना बसत आहे.

जिल्ह्यातील विविध शासकीय प्रकल्पांसाठी होणाऱ्या भू-संपादनाच्या जाहिराती स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केल्या जातात. मात्र, या जाहिरातींची बिले वेळेवर अदा केली जात नाहीत. या थकीत बिलांसाठी जिल्ह्यातील वृत्तपत्र संपादकांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलने केली, निवेदने दिली. मात्र, प्रशासनाने केवळ आश्वासनापलीकडे काहीही दिले नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भू-संपादन कार्यालयाकडून निधी मागणीचे प्रस्ताव छत्रपती संभाजीनगर येथील रोहयो आयुक्तांमार्फत मंत्रालयातील रोहयो विभागाकडे पाठवले जातात. सन २०२१ ते २०२४ या कालावधीत पाठवण्यात आलेल्या प्रस्तावांमध्ये काही तांत्रिक त्रुटी असल्याचे सांगत मंत्रालयाने ते पुन्हा जिल्हा स्तरावर पाठवले होते. मात्र, संबंधित भू-संपादन कार्यालयाने या त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव पुन्हा सादर करण्यात स्वारस्य दाखवले नाही. परिणामी, हे प्रस्ताव गेल्या तीन-चार वर्षांपासून धूळखात पडून आहेत. एकीकडे सरकार माहिती आणि जनसंपर्क विभागाच्या माध्यमातून पारदर्शकतेचा दावा करत असताना, दुसरीकडे बीड जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकारी जाहिरातींची बिले अडवून वृत्तपत्रांची गळचेपी करत असल्याचा आरोप होत आहे. ५० लाख रुपयांचा हा निधी तातडीने मंजूर करून वितरीत करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्ह्यातील वृत्तपत्र संपादकानी दिला आहे.

## केज शिक्षण विभागात समग्रशिक्षा अंतर्गत हंगामी अनिवासी ऊसतोड कामगार वस्तीगृहात बोगस मुलांचे नावाने एक कोटी रुपये अधिकाऱ्यांनी लाटले

### गटशिक्षण अधिकाऱ्यासह संबंधितची चौकशी करून कारवाई करा-भाई मोहन गुंड

बीड (सरकार)पंचायत समिती केज अंतर्गत गटशिक्षाधिकारी कर्यालय केज येथुन समग्रशिक्षा अभियान अर्तगत ऊसतोड कामगाराच्या पाल्यांसाठी स्थलांतर रोखपासाठी हंगामी अनिवाशी वस्तीगृह चालविण्यात होते या बोगस मुलांचे दाखवून जावळपा एक कोटी रुपये शालेय शिक्षण समितीला न देता परस्पर गटशिक्षण विभाग केज कार्यालयातून उचलली असल्याची तक्रार शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी जिल्हा परिषद चे मुख्य अधिकारी यांच्याकडे चौकशी मागणी केली आहे,

शाळा व्यवस्थापन समितीमार्फत प्रस्ताव मागवुन वस्तीगृह सुरु करण्यासाठी प्रस्ताव जिल्हा परिषदेस सादर केले जातात परंतु केज तालुक्यामध्ये तालुका स्तरावरुन शाळा व्यवस्थापन समिती मार्फत प्रस्ताव न मागविता परस्पर गटशिक्षणाधिकारी कार्यालयातुन जिल्हा परिषद बीडला मंजुरीसाठी पाठविण्यात आले प्रस्तावावर शाळा व्यवस्थापण समितीच्या स्वाक्षरी नाहीत, केज तालुक्यातील उमरी येथील हंगामी वस्तीगृह सरु केले नसल्याबाबत मुख्याध्यापक यांनी गटशिक्षणाधिकारी कर्यालयास लेखी कळविले होते परंतु गटशिक्षणाधिकारी कर्यालयातुन परस्पर ते वस्तीगृह सुरु केल्याचे दाखवुन ६६ विद्यार्थ्यांचे एकुण बोगस बील शाळा व्यवस्थापन समितीच्या परस्पर उचल्ले आहेत.



तर के.प्रा. शा. लव्हुरी येथे प्रत्यक्ष प्रस्तावाप्रमाणे लाभार्थी ८० एवढे आहेत , तपासनी वेळी १७ विद्यार्थी उपस्थित होते परंतु २१८ असे दाखवण्यात आले आहेत. प्रा. शा. सानपवस्ती तरनळी येथे २० पेक्षा कमी पटसंख्या असुन वस्तीगृहामध्ये लाभार्थी १९३ दाखविण्यात आले आहेत. प्रा. शा. लाडेवडगाव येथे प्रत्यक्ष लाभार्थी १२९ पेक्षा कमी असुन तेथे २४१ लाभार्थी दाखविण्यात आले आहे. प्रा. शा. तांबवा व प्रा. शा. पिसेगाव येथे पटसंख्येपेक्षा जास्त् अनुक्रमे १२८, १८० अशी जास्तीची लाभाथी संख्या दाखवली आहे. माळेवाडी येथे पटसंख्या ६३ पेक्षा कमी असुन वस्तीगृहाची विद्यार्थी संख्या १०१ दाखविली आली आहे. सोनिजवळा येथे पटसंख्या कमी असुन वस्तीगृहाची संख्या १३२ एवढी दाखवली आहे.

आंधळेवाडी येथे पटसंख्या ४६ असुन वस्तीगृहाची संख्या १५४ एवढी दाखवली आहे. तसेच हंगामी अनिवाशी वस्तीगृहास २०२५-२०२६ या वर्षामध्ये वस्तीगृह हे नोव्हेंबर महिण्यात सुरु झाले आहेत परंतु ते १५ ऑक्टोबर पासुन चालु असल्याचे दाखवुन १५ दिवसाचे मानधन उचलुन आर्थीक गैरव्यवहार केला आहे. गट शिक्षणाधिकारी कार्यालयातुन वस्तीगृहनिदाय आलेल्या रक्कम परस्पर शाळा व्यवस्थापन समितीस न देता सबंधित अधिकारी यांच्या जवळीक व्यक्तीच्या सबंधित व्यक्तीगत ते खात्यावर वर्ग करुन ती रक्कम परत घेतली गेली आहे. कोणत्याही शालेय समिती, पुरवढा धारक दुकानदाराच्या नावावर वर्ग न करता ती जवळच्या व्यक्तीच्या सेव्हिंग खात्यावर वर्ग केली आहे. विद्यार्थी यादी ही युडाएस प्रणाली प्रमाणे नसुन ती सर्वच शाळाला एकसारखी दाखवण्यात आली आहे. विद्यार्थी हजेरी बायोमॅट्रीक प्रमाणे उपस्तीती नाही त्याची प्रत्यक्ष तपासणी करण्यात यावी ती आनेक वस्तीगृहास कॉपीपेस्ट् करुन वापरली आहे.

सामान खरेदीच्या पावत्या ऋद्ध प्रमाणे नोंदवहित नाहीत सर्व पावत्यादर दाताने स्वस्वाक्षरी केल्या आहेत. सर्व बिलदार एकसारखे अक्षर असुन एकाच व्यक्तीकडुन ते बनविले आहेत सर्व बिलाची तपासणी करण्यात यावी. जिल्हा स्थरावरुन तपासणी पथकाचा अहवाल दोन पाने असुन त्यावरील विद्यार्थी संखेचे पहिले पेज परस्पर बदलण्यात आल्याचा संशय आहे, वरील सर्व बाबींची खोटी बनावट कागदपत्रे तयार करुन सन २०२५ २०२६ मधिल जवळपास एकुण १,२९,७५५३६ एवढया रक्कमेचा अपहार करण्यात आला आहे. सदरील प्रकरणी गटशिक्षणाधिकारी सह संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी संगणमत करुन खोटे अभिलेखे तयार करुन आर्थिक गैरव्यवहार केला आहे. सबंधिताची चौकशी करुन त्यांच्यावर आर्थीक अपहाराचे गुन्हे नोंद करुन निलंबिनाची कार्यवाही करण्यात यावी अन्यथा आपल्या शिक्षण विभागाच्या विरोधात २५ रोजी केज येथे भगवान बाबा ( कानडी ) चौक रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा शेकापचे भाई मोहन गुंड यांनी दिला आहे. निवेदच्या प्रति महाराष्ट्र राज्य प्रकल्प संचालक महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई , जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय बीड शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड यांना देण्यात आल्या आहेत..

## संविधानाचा मान ठेवा, भीमजयंतीच्या परवानग्या रोखू नका

### डॉल्बी परवानगीसाठी प्रशासनाला वंचित बहुजन आघाडीचा इशारा

बीड (सरकार):भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरात भीमजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. आनंदोत्सव साजरा करणे, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे आणि आपली सामाजिक-सांस्कृतिक अभिव्यक्ती मांडणे हा अधिकार भारतीय नागरिकांना भारतीय संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार आहे. तरीही बीड जिल्ह्यात जयंती उत्सव समित्यांना डॉल्बी साऊंड सिस्टिमसाठी परवानगी देताना प्रशासनाकडून जाचक अटी घालण्यात येत असल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. मा. सुप्रीम कोर्टाचे यांच्या विविध निर्णयांनुसार ध्वनीप्रदूषणाच्या मर्यादा पाळून कार्यक्रम आयोजित करण्यास परवानगी देता येते. त्यामुळे भीमजयंती उत्सव समित्यांना न्यायालयाच्या आदेशांच्या अधीन राहून कमी डेसिबलमध्ये डॉल्बी साऊंड सिस्टिम वापरण्याची परवानगी देण्यात यावी, अशी ठाम मागणी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे करण्यात आली आहे.

बीड शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर भीमजयंती साजरी केली जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील पोलीस निरीक्षकांना देखील स्पष्ट सूचना देऊन जयंती उत्सव समित्यांना विनाकारण त्रास देऊ नये आणि नियमानुसार साऊंड सिस्टिम वापरण्याची परवानगी द्यावी, असे पत्रक प्रशासनाने काढावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्ह्यात सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून अनेक युवकांनी एकत्र येत डॉल्बी साऊंड, लाईट शो व इतर कार्यक्रमांसाठी लागणारी उपकरणे खरेदी करून स्वतःचा रोजगार उभा केला आहे. परंतु ऐनवेळी पोलीस प्रशासनाकडून डॉल्बीवर बंदी घालण्यात येत असल्याने या युवकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होत असल्याचेही वंचित बहुजन आघाडीने स्पष्ट केले आहे. सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची पूर्ण काळजी आयोजकांकडून घेतली जाईल, असेही सांगण्यात आले.

### ''घर का भेदी, लंका ढाये'' बीभीषणाला भीमसैनिक धडा शिकवणार

चौकट :- आंबेडकरी चळवळीतील अनेक कार्यकर्ते पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देत भीमजयंती साजरी करण्याकडे कल वाढवत आहेत. मात्र स्वतःला आंबेडकरी चळवळीचे नेते म्हणवणारे काही अहंकारी व हुकूमशाही वृत्तीचे दलित नेते पोलीस प्रशासनाला हाताशी धरून समाजातीलच कार्यकर्त्यांना छळण्याचा प्रयत्न करत आहेत. यावर्षी साजरी होणाऱ्या जयंती मध्ये आपण कसलाही हस्तक्षेप करू नये अन्यथा जिल्ह्यातील भीमसैनिक तुम्हाला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही.

### वंचित बहुजन आघाडीचे भीमसैनिकांना आवाहन

वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने सर्व भीमसैनिकांना आवाहन करण्यात येते की, भीमजयंती उत्सव साजरा करताना कमी आवाजात डॉल्बी सिस्टीमचा वापर करावा तसेच पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे. ग्रामीण भागात कोणताही पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी विनाकारण त्रास देत असल्यास त्याच्या नावाने लेखी तक्रार जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे करावी व त्याची प्रत वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हाध्यक्षांकडे सादर करावी, जेणेकरून आवश्यक असल्यास न्यायालयीन प्रक्रिया राबवता येईल.

**अजय सरवदे**
जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, बीड

## वडीलांनी जमीन नावावर करण्यास नकार देताच मुलगा अन् सुनेचा प्राणघातक हल्ला

केज (सरकार): ज्या वडिलांनी लहानाचे मोठे केले, त्याच वडिलांनी शेती आणि ट्रॅक्टर नावावर करण्यास नकार दिला. म्हणून एका 'दिवट्या' मुलाने पत्नी आणि सासरच्या मंडळींच्या मदतीने स्वतःच्या पित्यावरच प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना केज तालुक्यातील नाव्होली येथे घडली . या हल्ल्यात वडील गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अंबाजोगाई येथे उपचार सुरू आहेत.



नाव्होली येथील रहिवासी सुभाष ठोंबरे यांचा मुलगा लक्ष्मण ठोंबरे हा गेल्या अनेक दिवसांपासून वडिलांच्या नावावर असलेली शेतजमीन आणि ट्रॅक्टर स्वतःच्या नावावर करण्यासाठी तगादा लावत होता. या कारणावरून घरात सतत वाद होत होते. १४ मार्च रोजी रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास हा वाद विकोपाला गेला. गावातील चौकात लक्ष्मण ठोंबरे आणि त्याची पत्नी सारिका यांनी सुभाष ठोंबरे यांना गाठले. ''जमीन आणि ट्रॅक्टर माझ्या नावावर का करत नाहीस?'' असा जाब विचारत त्यांनी काठीने बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. धक्कादायक बाब म्हणजे, सून सारिका हिचे माहेर त्याच गावात असल्याने तिचे आई-वडील, भाऊ आणि चुलते यांनीही घटनास्थळी धाव घेतली. आपल्या जावयाला साथ देत या सर्वांनी मिळून सुभाष ठोंबरे यांना अमानुषपणे मारहाण केली. भांडणाचा आवाज ऐकून सुभाष ठोंबरे यांची मुलगी मीना बिक्कड आणि जावई दादा बिक्कड हे बचावासाठी धावून आले. मात्र, संतप्त झालेल्या हल्लेखोरांनी त्यांनाही सोडले नाही. त्यांनाही मारहाण करत ''मध्ये आलात तर जीवे मारू'' अशी धमकी दिली.

## श्री.युवा माहेश्वरी बीडच्या अध्यक्षपदी राजेश्वर तापडिया तर सचिवपदी विजय डागा यांची निवड

बीड (सरकार) येथील श्री युवा माहेश्वरी संघटनेच्या अध्यक्षपदी राजेश्वर तापडिया यांची तर सचिवपदी विजय डागा यांची निवड करण्यात आली. एमआयडीसी भागात झालेल्या बैठकीत मान्यवरांच्या उपस्थितीत सर्वानुमते ही निवड करण्यात आली.

या बैठकीस महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी युवा संघटनेचे माजी सहसचिव अमर सारडा, मावळते अध्यक्ष ऋषीकेश सोहनी, सचिव अनूप चरखा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीत उपाध्यक्ष गोपाल लद्दड, कोषाध्यक्ष आशिष कासट, सहसचिव अजय डागा, संघटनमंत्री युवराज चरखा यांचा समावेश आहे. यावेळी संघटनेच्या वतीने आयोजीत करण्यात येणार्या रक्तदान शिबीर, सुंदरकांड, कुलदेवी प्रोजेक्ट, दांडिया यासह इतर उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीस युवा माहेश्वरीचे सदस्य मयुर कासट, संतोष तोष्णीवाल, नीरज सारडा, रोशन टवाणी, राहुल लोहीया, पंकज धूत, हेमंत बियाणी, संकेत टवाणी, पंकज भुतडा, कमलेश रांदड, सचिन लड्डा, महेश लड्डा, अमित मंत्री, शुभम सिकची, अमित बाहेती, अभिजित दोड़े, श्रीकांत बियाणी, आशिष चरखा, मयुर काबरा, प्रसाद रांदड, अजय लड्डा, अनिल लड्डा, ऋषीकेश मानधने, पवन भक्कड, संतोष सोमाणी, संकेत टवानी,आकाश चरखा, आनंद चांडक डॉ रमण बियानी, सीए न्न्यानेश चरखा, रुपेश मानधने,अनुज चरखा, महेश बियानी, संकेत तापडिया, सीए ऋषीकेश मूंदड़ा यांची उपस्थिती होती.

## युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम बंगाल विधानसभेत प्रचार

**बीडचा युवा दत्तप्रसाद जाधव यांची पश्चिम बंगाल विधानसभेत प्रचारक पदी निवड**

बीड (सरकार)भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सचिव दत्तप्रसाद जाधव यांची पश्चिम बंगाल विधानसभेत प्रवासी कार्यकर्ता प्रचारक म्हणून प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी मराठवाडा विभागातून निवड केली आहे.हि निवड केल्याबद्दल महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण,कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे,माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे,प्रदेश सचिव राहुल लोणीकर, प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख,मराठवाडा समन्वयक अरुण पाठक यांचे दत्तप्रसाद जाधव यांनी आभार मानले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,आता होत असलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील युवा मोर्चाचे पदाधिकारी प्रवासी कार्यकर्ता म्हणून प्रचार करणार आहेत. यामध्ये दत्तप्रसाद जाधव यांची प्रवासी कार्यकर्ता प्रचारक म्हणून त्यांनी निवड केली आहे. या निवडणुकीत युवा मोर्चाचे पदाधिकारी राष्ट्रीय नेत्यांसोबत पश्चिम बंगाल राज्यातील विधानसभा निवडणुकीत प्रचार करणार आहेत.या निवडीबद्दल सर्व स्तरातून युवा नेत्याचे अभिनंदन केले जात आहे.

## ज्या धरणामुळे कर्झणीकर बेघर झाले त्याच धरणात उपोषण करण्याची वेळ

बीड (सरकार): तालुक्यातील बीड शहरासाठी काही दिधवस पाणी पुरवठा करणारे खटकाळी धरण ज्या धरणामुळे ७३ कुटूंब बेघर झाले व भूमिहीन झाले तेच कुटुंब शासनाने वाऱ्यावर सोडले आहे.

सन १९७२ साली खटकाळी धरण झाले होते. त्या वेळेस सरकार जे कर्झणी ग्रामस्थांना सरकारी गायरान गट नंबर १५८ मध्ये जगा दिली होती तेंव्हापासून आजपर्यंत त्या जागेत कर्झणी हे गाव वसले आहे. त्या ठिकाणी शाळा, मंदिर, सभामंडप घरे आहेत परंतु ती जागा आता सरकारने वन विभागास दिली आहे. त्यामु आता त्या जागेत कोणताही विकास करण्यात येत नाही. घर बांधता येत नाही. कारण वन विभागातील अधिकारी काम अडवतात. रस्ता करता येत नाही. ती जागा शासनाने धरणग्रस्त गावासाठी देण्यात यावी यासाठी दि.१९ मार्च रोजी सर्व गावकरी, ग्रामस्थ धरणात उपोषणास बसणार असल्याचा इशारा ग्रामस्थांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिला आहे.

## बीड हादरले! विवाहितेचा वर्णभेदावरून छळ,विष पिऊन केली आत्महत्या; सासरच्या तिघांवर गुन्हा

माजलगाव (सरकार): तालुक्यातून मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. रंगावरून सातत्याने अपमान आणि माहेरहून पैसे आणण्याच्या छळाला कंटाळून एका विवाहित महिलेने विष प्राशन करून आत्महत्या केल्याचा आरोप आहे. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी पतीसह सासू-सासऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने परिसरात खळबळ उडाली असून महिलांवरील छळाचा गंभीर मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

या घटनेतील मृत महिलेचे नाव ज्योती पवार असे आहे. तिचा विवाह २०१८ साली माजलगाव तालुक्यातील तालखेड परिसरातील तळतांडा येथील कृष्णा पवार यांच्याशी झाला होता. या प्रकरणात पती कृष्णा पवार, सासरा मनोहर पवार आणि सासू ताराबाई पवार यांच्यावर छळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

लग्नानंतर काही काळ सर्व काही सुरळीत होते. मात्र त्यानंतर पतीच्या व्यवसायासाठी माहेरहून पैसे आणण्याची मागणी करत सासरच्या मंडळींकडून महिलेचा छळ सुरू झाल्याचा आरोप आहे. तसेच तू रंगाने काळी आहेस, आम्हाला आवडत नाहीस असे म्हणत तिचा वारंवार मानसिक छळ केला जात होता, असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या सततच्या त्रासाला कंटाळून ज्योती पवार यांनी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला.

ज्योती पवार यांनी १२ जानेवारी २०२६ रोजी विष प्राशन केले होते. त्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच १८ जानेवारी २०२६ रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर काही दिवसांनी, १३ मार्च २०२६ रोजी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.ही घटना बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील तळतांडा परिसरात घडली. विष प्राशन केल्यानंतर ज्योती पवार यांना प्रथम छत्रपती संभाजीनगर येथे आणि नंतर पुणे येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

पीडित महिलेवर कथितपणे दोन कारणांमुळे छळ होत असल्याचा आरोप आहे. एक म्हणजे पतीच्या व्यवसायासाठी माहेरहून पैसे आणण्याची मागणी आणि दुसरे म्हणजे तिच्या रंगावरून सातत्याने केले जाणारे अपमानास्पद वक्तव्य. या मानसिक छळामुळे ती अत्यंत त्रस्त झाली होती आणि शेवटी तिने आत्महत्येचा मार्ग स्वीकारल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. सततच्या छळाला कंटाळून ज्योती पवार यांनी १२ जानेवारी रोजी विष प्राशन केले. त्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. काही दिवस उपचार सुरू होते, मात्र प्रकृती गंभीर झाल्याने १८ जानेवारी रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर कुटुंबीयांनी पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानुसार माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात पती कृष्णा पवार, सासरा मनोहर पवार आणि सासू ताराबाई पवार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)